**L. A. BILL No. VIII OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८.**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७५ चा महा. ४४. **ज्याअर्थी,** यात पुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे.

(शा.म.मु.) एचबी ५०२–१ (२००-७-२०२१)

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास, महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २ ची सुधारणा. **२.** महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, १९७५ चा महा. ४४. " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम २ मधील,—

(१) खंड (१-क) ला खंड (१-कक) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(२) असा नवीन क्रमांक दिलेल्या खंड (१-कक) च्या अगोदर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (१-क) " पुरातन (हेरीटेज) वृक्ष " याचा अर्थ, शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येतील अशा मानकांनुसार, वृक्ष प्राधिकरणाद्वारे तसे वर्गीकृत केलेले झाड, असा आहे ; ".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ३ ची सुधारणा. **३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३ मधील,—

(१) पोट-कलम (१) च्या अगोदर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (अ-१) महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०२१ सन २०२१ चा महा. याच्या प्रारंभानंतर, होईल तितक्या लवकर, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासनाच्या सचिव पदापेक्षा कमी दर्जाचे नसतील अशा अधिकाऱ्यांचा समावेश असणारे, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण घटित करील. ";

(२) पोट-कलम (२) मधील, तक्त्यामधील, नोंद २ मधील, स्तंभ (२) मधील " नगरपालिकेचा अध्यक्ष " या शब्दांऐवजी " नगरपालिकेचा मुख्य अधिकारी " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) पोट-कलम (३) मधील, " ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रातले विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा, बिनसरकारी संघटनांच्या प्रतिनिधींना " या मजकुराऐवजी " शासनाद्वारे, वेळोवेळी अधिसूचित करण्यात येईल अशा किमान कालावधीचा, झाडांची लागवड (रोपण), जतन व संवर्धन यांमधील अनुभव असलेल्या बिनसरकारी संघटनांसह सेवानिवृत्त शासकीय अधिकाऱ्यांपैकी तज्ज्ञ व्यक्तींना" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ यामध्ये नवीन कलम ६अ समाविष्ट करणे. **४.** मुख्य अधिनियमाच्या प्रकरण चार मधील, कलम ७ च्या अगोदर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची कर्तव्ये. " **६अ.** संबद्ध अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, आणि राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण निदेशांस अधीन राहून, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल :—

(एक) वृक्ष प्राधिकरणाच्या कामकाजाचे संनियंत्रण करणे ;

(दोन) संपूर्ण राज्यातील पुरातन (हेरीटेज) वृक्षांचे संरक्षण व संवर्धन करणे ;

(तीन) पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्याच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(चार) पुरातन (हेरीटेज) वृक्ष तोडण्याच्या संबंधात, वृक्ष प्राधिकरणाने त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेल्या अर्जांवर निर्णय घेणे ;

(पाच) झाडाचे संरक्षण व संवर्धन करण्याशी संबंधित असणारी इतर कोणतीही कामे करणे. ".

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मधील,— १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ७ ची सुधारणा.

(१) खंड (ब) मध्ये, "पाच वर्षांतून एकदा" या मजकुरानंतर, "भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयएस) आधारित झाडांची गणना किंवा अन्य कोणतेही आधुनिक तंत्रज्ञान यांसारख्या नवीन तंत्रज्ञान साधनांचा वापर करून" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (आय) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :—

"(आय) प्रतिरोपण करण्यात येणाऱ्या झाडाच्या वयाच्या संख्येएवढी, त्याच जातीच्या किंवा इतर कोणत्याही स्थानिक किंवा मूळ जातीच्या झाडांची लागवड करणे आणि असे प्रतिरोपण केवळ तज्ञांच्या मार्गदर्शनाखालीच करणे ;

(ज) नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकार क्षेत्रातील सर्व जमिनींमध्ये भरपाई वृक्ष लागवड केली जात असल्याची आणि भरपाई वृक्ष लागवडीसह सर्व झाडे जगतील याची सुनिश्चिती करणे ;

(के) झाडांचे संवर्धन व जतन करण्यासाठी वृक्ष उपकराचा विनियोग करण्याची सुनिश्चिती करणे ;

(ल) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाने, वेळोवेळी नेमून दिलेले इतर कोणतेही उपक्रम पार पाडणे ;

(म) पुरातन (हेरीटेज) वृक्ष म्हणून कोणते झाड वर्गीकृत करावयाचे आहे याचा निर्णय घेणे आणि पुरातन (हेरीटेज) वृक्षांची प्रगणना करणे ;

(न) नागरी स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीची जमीन किंवा शासनाच्या मालकीची जमीन वृक्षारोपणाच्या प्रयोजनासाठी राखून ठेवली आहे याची सुनिश्चिती करणे, आणि असे वृक्षारोपण, शास्त्रीयदृष्ट्या करण्यात येईल आणि स्थानिक प्रजातींचे जतन करण्याच्या आणि ३३ टक्केपेक्षा कमी नसेल इतक्या मर्यादेपर्यंत हरित आच्छादित क्षेत्रामध्ये वाढ करण्याच्या उद्देशाने करण्यात येईल याची सुनिश्चिती करणे ;

(ओ) प्रत्येक वर्षी, तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रीय पद्धतीने झाडांची छाटणी करण्याची व त्यांची देखभाल करण्याची सुनिश्चिती करणे ;

(प) नैसर्गिकरीत्या पडलेल्या प्रत्येक झाडासाठी, नागरी स्थानिक प्राधिकरणाकडून भरपाई वृक्ष लागवड केली जात असल्याची सुनिश्चिती करणे ;

(क्यू) या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी इतर कोणत्याही योजना किंवा उपाययोजना हाती घेणे.".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८ मधील,— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम ८ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जेव्हा मोठ्या प्रमाणात झाडे पाडण्याचे प्रस्तावित केले असेल त्याबाबतीत, संबंधित संकल्पचित्रासाठी, पाडणे आवश्यक असलेल्या झाडांच्या संख्येसह पर्यायी संकल्पचित्र, अर्जासोबत सादर करण्यात येईल.".

(२) पोट-कलम (३), मध्ये,–

(अ) खंड (क) मधील,–

(एक) उप-खंड (तीन) मधील "आणि" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(दोन) उप-खंड (चार) नंतर, पुढील उप-खंड जादा दाखल करण्यात येतील :—

"(पाच) जर पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडावयाचा असेल तर, जाहिरातीमध्ये विनिर्दिष्टरीत्या तसे नमूद करावे ; आणि

(सहा) शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा निकषानुसार व पद्धतीनुसार पाडावयाच्या झाडाचे वय निर्धारीत करणे." ;

(ब) खंड (अ-१) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, जेव्हा पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशे पेक्षा अधिक झाडे पाडण्याचे प्रस्तावित असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु आणखी असे की, जेव्हा पाडण्याचे प्रस्तावित केलेले झाड हे, पुरातन (हेरीटेज) वृक्ष असेल तेव्हा, अशा बाबतीत, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, सदर प्रकरण, त्याच्या अहवालासह व शिफारशींसह, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील :

परंतु तसेच, वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पाडावयाच्या झाडांची संख्या दोनशे पेक्षा कमी ठेवता यावी म्हणून भूविकास किंवा अन्य कोणताही प्रकल्प, लहान-लहान भागांमध्ये उप-विभाजित केला जाणार नाही याची खात्री करील." ;

(३) पोट-कलम (४) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या पोट-कलमाच्या तरतुदी पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याच्या बाबतीत लागू असणार नाहीत." ;

(४) पोट-कलम (५) मधील,—

(अ) पोट-कलम (५) ला खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ;

(ब) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या खंड (अ) मध्ये "अर्जदार, पाडावयाच्या झाडांच्या दुप्पट झाडे लावील," या मजकुराऐवजी "अर्जदार, पाडण्यात येणाऱ्या झाडांच्या अंदाजित केलेल्या वयाइतक्या झाडांच्या संख्येइतकी झाडे लावील आणि लावण्यात यावयाची अशी झाडे ही, किमान सहा फूट इतक्या उंचीची असतील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या खंड (अ) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येईल :—

" (ब) वृक्ष अधिकारी, शासनाकडून अधिसूचित करण्यात येईल अशा निकषानुसार व पद्धतीनुसार पाडल्या जाणाऱ्या झाडाचे वय निर्धारित करील." ;

(५) पोट-कलम (५) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :—

" (५अ) अर्जदार व वृक्ष प्राधिकरण किंवा वृक्ष अधिकारी असे सुनिश्चित करतील की, भरपाई वृक्ष लागवड करण्यात येईल आणि लावलेली झाडे कमीत कमी सात वर्षांच्या कालावधीसाठी जगतील. या कालावधीमध्ये झाडे न जगल्यास, तितक्याच संख्येतील झाडांची लागवड करून त्याची हानीपूर्ती (भरपाई) करण्यात येईल, याची देखील ते सुनिश्चिती करतील :

परंतु, जर भरपाई वृक्ष लागवड करणे अर्जदाराला शक्य नसेल तर, अर्जदार, पाडलेल्या झाडांच्या मूल्यांपेक्षा कमी नसेल इतकी रक्कम जमा करील. असे मूल्यांकन शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीवर आधारित असेल :

परंतु आणखी असे की, जमा केलेल्या रकमेचा विनियोग केवळ, भरपाई वृक्ष लागवडीसाठी, त्याच्या जतन करण्याच्या आणि या कालावधीत न जगलेल्या झाडांच्याऐवजी भरपाई वृक्ष लागवड करण्याच्या प्रयोजनासाठीच करण्यात येईल.

(५ब) (अ) वृक्ष प्राधिकरण, पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयाची दोनशेपेक्षा अधिक झाडे पाडण्यासाठी प्राप्त झालेला अर्ज, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(ब) वृक्ष प्राधिकरण, किंवा यथास्थिति, वृक्ष अधिकारी, पुरातन (हेरीटेज) वृक्ष पाडण्याचा अर्ज महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडे निर्दिष्ट करील.

(क) महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, वृक्ष प्राधिकरणाने किंवा, यथास्थिति, वृक्ष अधिकाऱ्याने खंड (अ) व (ब) अन्वये त्यांच्याकडे निर्दिष्ट केलेला अर्ज, वृक्ष प्राधिकरणाकडून किंवा वृक्ष अधिकाऱ्याकडून संदर्भ प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या कालावधीत, शर्तीसह किंवा शर्तीशिवाय, एकतर मान्य करील अथवा तो नाकारू शकेल.

(ड) जेव्हा महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरण, झाडे पाडण्याला परवानगी देईल तेव्हा, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाच्या निर्णयाचे पुनर्विलोकन करणे आवश्यक असल्याचे वाटत असेल तर, वृक्ष प्राधिकरण, निर्णय कळविल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या कालावधीत निर्णयाचा फेरविचार करण्यासाठी त्याच्या कारणांसह महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाला विनंती करू शकेल. त्यानंतर, अशा विनंतीवर, महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाकडून दहा दिवसांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

(५क) पोट-कलम (५) अन्वये झाडे पाडण्यास परवानगी दिलेल्या झाडांच्या ऐवजी लागवड केलेल्या नवीन झाडांचे, उपलब्ध असलेल्या नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून भौगोलिक स्थानचित्रांकन (जिओ-टगिंग) व संनियंत्रण करण्यात येईल.".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम १८ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १८ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

" (३) या कलमाच्या तरतुदींअन्वये जमा केलेल्या वृक्ष उपकराचा विनियोग, शासन वेळोवेळी निदेश देईल अशा रीतीने, स्थानिक प्राधिकरणाद्वारे करण्यात येईल.

(४) राज्य शासनास, विद्यमान हरितआच्छादन क्षेत्रे विचारात घेऊन आणि झाडांचे जतन व संवर्धन करण्यासाठी क्षेत्राच्या गरजेचे निर्धारण करून, विविध नागरी स्थानिक प्राधिकरणांसाठी, उपकराच्या विनियोगासाठी निदेश देता येतील व विविध निकष, निर्धारित करता येतील.".

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ याच्या कलम २१ ची सुधारणा.

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम २१ च्या पोट-कलम (१) मध्ये, " एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या " या मजकुराऐवजी, " शासनाद्वारे अधिसूचित करण्यात येईल अशा पद्धतीचा वापर करून, काढलेल्या झाडाच्या मूल्याइतके परंतु, एक लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८.]**

**[महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. आदित्य ठाकरे,**
पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री.**]**

**(विधानसभेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई